


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ६ एप्रिल २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १८७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

**आजचा सामना**

Royal Challengers Bangalore Vs Rajasthan Royals

राजस्थान रॉयल्स वि.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु

वेळ : ७.३० वा. स्थळ : जयपूर



### पवारांची माढ्यात

# सावध खेळी

### मोहिते पाटील-रामराजेंची

# बांधणार मोळी

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**ज्येष्ठ नेते शरद पवार माढ्याच्या बाबतीत कोणतीही रिस्क घेणार नाहीत याचा प्रत्यय शुक्रवारी आला. माढा लोकसभा मतदारसंघात धैर्यशील मोहिते पाटील यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करण्याआधी या मतदारसंघातील सर्व विरोधकांची मोळी बांधण्याची दक्षता पवार घेत आहेत, त्याचाच एक भाग म्हणून एक पाऊल मागे घेत भाजपचे आमदार रणजीत दादा यांच्याबाबतचा आग्रह पवारांनी सोडला असला तरी दुसरी एक अट पुढे केलीय. माढ्यातील बंडखोरीत पुढारपण घेणाऱ्या सर्व नेत्यांनी एकत्र येऊन धैर्यशील मोहिते पाटील यांच्या उमेदवारीवर एकमत करावे, असे सांगत पवारांनी माढ्याचा निर्णय मोहिते-पाटील आणि रामराजे परिवाराच्या गळ्यात बांधला आहे.**

### पवारांना पत्करायचा नाही धोका

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची माढ्याची जागा कोणत्याही परिस्थितीत निवडून आणण्याचा शरद पवार यांचा दृढ निश्चय आहे. भाजपाचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यासोबत सहा विद्यमान आमदारांसह करमाळ्याचा बागल गट तसेच उत्तम जानकर गट आहे. एवढी मोठी ताकद एकीकडे असताना आपल्या गटाकडं एकही आमदार नाही. हे लक्षात घेता, निंबाळकर आणि मोहिते-पाटील या गटाची ताकद लोकसभेसाठी एकत्र व्हायला हवी, तरच माढ्याची लढत आपल्या गटाकडून प्रबळ होईल, असे शरद पवारांना वाटते. माढ्याच्या बाबतीत चांगल्या मोर्चेबांधणीतून त्यांना निवडणूक लढवायची आहे, धोका पत्करायचा नाही, अशी भूमिका त्यांची आहे.

### राजीनामे देण्याबद्दल अद्याप बोलणं नाही

राष्ट्रवादी शरचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याच्या पार्श्वभूमीवर, मोहिते-पाटील परिवारातील संबंधितांनी राजीनामे द्यावे, असा कोणताही निरोप अद्याप शरद पवार किंवा जयंत पाटील यांनी मोहिते-पाटील परिवाराला शुक्रवारपर्यंत तरी दिलेला नाही, असे खात्रीलायकरित्या सांगण्यात आले.

अकलूजकर मोहिते-पाटील यांना राष्ट्रवादीत प्रवेश देऊन माढा लोकसभेच्या निवडणुकीसाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हाती तुतारी देण्याच्या तडजोडीत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज शुक्रवारी एक पाऊल पुढं टाकलं आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात मोहिते-पाटील परिवाराला प्रवेश देताना आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्याबाबतीत शरद पवार यांनी सौम्य आणि समजूतदारपणाी भूमिका घेतल्याची खात्रीशीर माहिती समोर आली आहे. यायचं असेल तर मोहिते-पाटील घराण्यातील सर्वांनी यावं, विजयदादा-प्रतापसिंह फॉर्म्यूला आता नको, अशी यापूर्वी घातलेली अट पवार यांनी शिथील केली आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे मोहिते-पाटील यांची राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याची मुख्य तांत्रिक अडचणच दूर झाली आहे.



दरम्यान, रणजितदादांच्या भाजप आमदारकीवरुन मोहिते-पाटील परिवारापुढील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचा पेच संपविणाऱ्या पवार यांनी दुसरी एक अट टाकली आहे. भाजपनं धैर्यशील यांना उमेदवारी नाकारल्यानंतर अकलूजच्या 'शिवरत्न' बंगल्यावर जे नेते जमले. ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांची भेट घेऊन भाजप विरोधात बंडाचं निशाण फडकावण्यावर शेकापचे आमदार जयंत पाटील, ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर, त्यांचे बंधू संजीवराजे, शेकापचे युवा नेते अनिकेत देशमुख, डॉ.बाबासाहेब देशमुख, करमाळ्याचे आमदार नारायण पाटील, माजी आमदार जयवंतराव जगताप, टेभूर्णीचे संजय कोकाटे आदी नेतेमंडळींनी चर्चा केली होती, त्या सर्वांनी एकत्रीतपणे धैर्यशील यांच्या उमेदवारीबद्दल पक्षाशी चर्चा करावी, त्यातून त्यांच्या उमेदवारीचा मार्ग सुकर होईल, असेही शरद पवार यांनी आज सांगितलं.

### रामराजे गटाची शरद पवारांना शंका

ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांचा गट सध्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी गटासोबत आहे. हा गट महायुतीत आहे. महायुतीचा धर्म पाळण्यातून या गटाला माढ्यातील भाजप उमेदवाराचे काम करणे क्रमप्राप्त आहे, इथल्या भाजप उमेदवाराचं काम करावं, असं खुद्द अजित पवार यांनीच रामराजे निंबाळकर यांना सांगितलं आहे. भाजप उमदेवाराचं काम करण्यावरुन रामराजे निंबाळकर गटावर अजित पवार, देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दबाव आणल्यास रामराजे निंबाळकर यांची गोष्ट अवघड होऊ शकते. अशा परिस्थितीत रामराजे निंबाळकर गट हा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांचं काम कसं करणार? याची शंका शरद पवारांना आहे.त्यातूनच त्यांनी रामराजे निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांनी एकत्र बसून निर्णय घ्यावा आणि त्यानंतर आपल्याकडं यावं, अशी भूमिका शरद पवारांनी घेतली आहे.

### संजीवराजेंना नव्हे, धैर्यशील यांना उमेदवारीचं समर्थन

संजीवराजे निंबाळकर यांच्यापेक्षा सर्वच आघाड्यांवर अकलूजकर मोहिते-पाटील यांची उमेदवारी शरद पवार यांना सरस वाटते. खुद्द पवार यांना या संदर्भात तीन वेळा सर्व्हेक्षण करुन घेतले आहे. त्यामध्ये धैर्यशील मोहिते-पाटील यांना समर्थन अधिक आहे. शिवाय भविष्यातील पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणासाठी मोहिते-पाटील हे निंबाळकर यांच्यापेक्षा उजवे ठरु शकतात. हे लक्षात घेता, मोहिते-पाटील यांच्यावर पवारांची मर्जी दिसते. मात्र, भाजपाचे खा.नाईक-निंबाळकर यांच्यासोबत फाईट देताना रामराजे निंबाळकर गटाची ताकद धैर्यशील यांच्या सोबत असणे गरजेचे आहे, म्हणून शरद पवार हे रामराजे निंबाळकर गटाला बांधून घेत असल्याचं मानलं जात आहे.

### हजारो समर्थकांचे राजीनामे, अपक्ष लढण्याचा आग्रह

# तानाजी सावंत समर्थकांचं 'धाराशिव'मध्ये बंड!

✔ सुहास मस्के/परंडा

**धाराशिव मतदारसंघात भाजपचे आमदार राणाजगजितसिंह यांच्या पत्नी अर्चना यांना उमेदवारी जाहीर झाल्याने शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि पालकमंत्री तानाजी सावंत यांच्या गटाने बंडखोरीचा पवित्रा घेतला आहे. सोनारी येथील कारखान्यात सावंत गटाची बैठक झाली त्यात हजारो कार्यकर्त्यांनी आपल्या पदाचे राजीनामे मुख्यमंत्र्यांकडे पाठवले. दरम्यान, डॉ. तानाजी सावंत यांनी उद्या बैठक आयोजित केली असून त्यात त्यांची पुढील भूमिका ठरण्याची शक्यता आहे. सावंत गट बंडाचं निशान फडकविणार की विरोधाच्या तलवारी म्यान करत युतीचा धर्म पाळणार याची संपूर्ण धाराशीव लोकसभेच्या मतदार संघात आहे.**

**आता माघार नाही! :** ज्यांच्याशी संघर्ष केला, त्यांच्याशी युती जमणार नाही. कोणत्या तोंडाने आम्ही लोकांकडे मते मागायची? आजवर आपले जिल्ह्यातील वर्चस्व संपवण्याचा प्रयत्न वेगळ्या मार्गाने सुरू झाला आहे. त्याला तोंड देण्यासाठी आम्ही समर्थ आहोत. कोणत्याही स्थितीत आम्ही माघार घेणार नाही, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी मांडली.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला आमचा विरोध असून आम्ही त्यांचा प्रचार करणार नाही. पाहिजे तर आमचे राजीनामे घ्या, असे म्हणत हजारो कार्यकर्ते गुरूवारी रात्री सोनारी येथील कारखान्यावर गोळा झाले होते. त्यांनी पदाचे राजीनामे मुख्यमंत्री शिंदे यांना पाठवून दिले. अर्चना पाटील यांच्या उमेदवारीचे पडसाद काल भूम, परंडा, वाशी मतदारसंघांमध्ये उमटले.

महायुतीमध्ये विरजण पडण्याची शक्यता असून तानाजी सावंत यांचे पुतणे जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत हे अपक्ष उमेदवारी दाखल करू शकतात अशी शक्यता आहे. अर्चना पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा होताच कार्यकर्त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल केल्या. त्यामध्ये आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचा फोटो असल्यामुळे सावंत समर्थक अधिकच चिडले. उस्मानाबाद मतदारसंघांमध्ये अजित पवार गटाने बाजी मारली असून तानाजी सावंत यांना मात दिली आहे. सावंत समर्थक काल रात्री आठच्या सुमारास कारखान्यावर एकत्र आले आणि घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला. यावेळी किमान हजार ते दीड हजार कार्यकर्ते एकत्र आले होते. 'धनंजय सावंत तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है' या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. राष्ट्रवादीचा प्रचार करणारच नाही, असं ठासून कार्यकर्ते सांगत आहेत.

> **आज बैठक**
>
> शिवसेनेचा गढ असलेल्या धाराशीव लोकसभा मतदार संघाची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाला सुटल्याने शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यामध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस कडून उमेदवारीसाठी अर्चना पाटील यांच्या नावाची घोषणा झाल्यावर नाराज शिंदे गटच्या कार्यकर्त्यांची रात्री सोनारी येथील भैरवनाथ साखर कारखान्यावर कार्यकर्त्यांची बैठक झाली महायुतीच्या निर्णयावर कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे, आरोग्यमंत्री डॉ तानाजी सावंत हे शनिवारी (दि ६) मार्च रोजी कार्यकर्त्यांची बैठक घेणार असल्याची माहिती मिळाली असून सावंत काय निर्णय घेतात, या कडे संपूर्ण जिल्हयाचे लक्ष लागले आहे.

### परंपरागत मुस्लिम मतासांठी

# व्यूहरचना



सोलापूर लोकसभा मतदारसंघात लिंगायत, पद्मशाली, धनगर मराठा या समाजानंतर मुस्लीम मतदारांची संख्या महत्त्वाची आहे. वळपास तीन लाख वीस हजार पर्यंत मुस्लीम समाजाची मते आहेत. त्यापैकी शहरमध्ये एक लाख सहा हजार मते आहेत. ही मते कोणाला जाणार यावर आकडेमोड प्रमुख पक्षांमध्ये सुरू झाली आहे. आजवर मुस्लीम मते लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या बाजूने गेली आहेत. यंदा मात्र एमआयएमने उमेदवार उभा केला तर मुस्लीम मतांचा कौल कोणाकडे असणार हे पाहावे लागेल. परंपरागत मुस्लीम मते आपल्याकडे ठेवण्यासाठी काँग्रेसने व्यूहरचना आखली आहे. आमदार राम सातपुते आणि आमदार प्रणिती शिंदे या दोघांनीही प्रचार यंत्रणा सक्रिय केली आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघात शहर मध्ये सर्वाधिक एक लाख सहा हजार मुस्लीम समाज आहे. हा समाज आतापर्यंत लोकसभेला तरी काँग्रेसच्या मागे ठामपणे उभा राहिल्याचे दिसून येते.

गेल्या दोन विधानसभा निवडणुकीपासून मुस्लीम समाजामध्ये ध्रुवीकरण झाल्याचे दिसून येत आहे. मुस्लीम समाज विधानसभेला एमआयएम आणि काँग्रेस या दोन्ही बाजूने आतापर्यंत झुकलेला दिसून येत आहे. लोकसभा निवडणुकीत एमआयएमने कधीही उमेदवार उभा केला नाही. गत लोकसभा निवडणुकीत एमआयएमने वंचित आघाडी सोबत युती केली होती. या आघाडीकडून डॉ. प्रकाश आंबेडकर उभे होते. त्यांनाही काही प्रमाणात आमदार प्रणिती शिंदे या शहर मध्य विधानसभाचे प्रतिनिधित्व करत आहेत. शहर मध्य विधानसभेच्या मतदारसंघात आमदार प्रणिती शिंदे यांनी अनेक विकास कामे केली आहेत. मुस्लीम समाजाच्याही अनेक प्रश्नांवर त्यांनी आवाज उठवलेला आहे. त्यांचे विविध प्रश्न मार्गी लावले आहेत. त्यामुळे एमआयएमचा उमेदवार असला तरी विधानसभेला मुस्लीम समाज प्रणिती यांच्या पाठीमागे राहिलेला आहे. काँग्रेस आणि शरद पवार गटाकडे अनेक मुस्लीम नेते आहेत, अनेक माजी नगरसेवक मुस्लीम समाजाचे आहेत. त्यांच्यामार्फतही मुस्लीम समाजाला जोडण्याचा प्रयत्न काँग्रेसचा असणार आहे. इतर पाच विधानसभा मतदारसंघातील मुस्लीम मतांसाठी काँग्रेसने रणनीती आखली आहे.

मुस्लीम समाज भाजप पासून दूर असल्याचे कायम बोलले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुस्लीमांसाठी काय केले याचा पाढा भाजपकडून वाचला जाईल. तीन तलाखचा प्रश्न मिटवल्यामुळे मुस्लीम महिला भाजपच्या पाठीमागे उभे राहतील, असा विश्वास भाजपला आहे.

### ये दोस्ती हम नही छोडेंगे...

# त्रिदेव एकत्र

✔ शिवाजी भोसले/सोलापूर

**राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रू वा मित्र नसतो, असं म्हटलं जातं त्याचाच प्रत्यय सध्या लोकसभेच्या निवडणुकीच्या निमित्तानं प्रकर्षानं येतोय. ज्येष्ठ नेते शरद पवार, सुशीलकुमार शिंदे अन् विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याबाबतीत मध्यंतरीच्या काळमध्ये खूप पाणी पुलाखालून वाहिलं असलं तरी सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणाशी संबंधित असलेलं राजकीय पटलावरचे हे अमर, अकबर अन् अँथनी हे २००९ प्रमाणं सोलापूर आणि माढ्या लोकसभेच्या महासंग्रामात एकत्र दिसतील तसा योगदेखील आलाय. दोस्ताना टिकविण्याच्या बाबतीत जसं म्हटलं जातं 'ये दोस्ती हम नही तोडेंगे, तोडेंगे दम मगर तेरा साथ ना छोडेंगे' त्याप्रमाणं लोकसभेच्या निवडणुकीच्या निमित्तानं साधारण १५ वर्षांनी एकत्र आलेले शरद पवार, सुशीलकुमार शिंदे अन् विजयसिंह मोहिते-पाटील या त्रिदेवांच्या संदर्भात 'ये राजकारण हम नही छोडेंगे, तोडेंगे दम मगर लोकसभा का चुनाव जितेंगे' असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.**

बदल हा निसर्गाचा नियम. हा नियम राजकारणाला लागू पडतो. शरद पवार आणि विजयसिंह मोहिते-पाटील याचं तसं बरं चाललेलं. दोघंही राष्ट्रवादीत. पण 'कारण राजकारण' घडलं. बारामतीकर पवार अन् अकलूजकर मोहिते-पाटील यांच्यात वितुष्ट आलं. घड्याळाचे काटे उलटे सुलटे फिरले. मोहिते-पाटील यांनी घड्याळ बाजूला करत भाजपचं 'कमळ' हाती घेतलं. तर दुसरीकडं सुशीलकुमार शिंदें यांचा काँग्रेससोबतचा प्रवास सुरूच होता. तिघांचं वेगवेगळ्या ध्रुवावर राजकारण चालू होतं.

याच टप्प्यावर महाराष्ट्रात बदलाच्या राजकारणाची त्सुनामी आली. राजकारणात जणू फाटाफुटीची ढग फुटली झाली. प्रचंड मोठ्या राजकीय उलथापालथीत महायुतीनं जन्म घेतला. हे मित्र ते विरोधक झाले अन् विरोधक होत ते मित्र झाले. अलटीची पालटी आणि पालटीची आलटी झाली. यामध्ये शरद पवार, विजयसिंह मोहिते-पाटील आणि सुशीलकुमार शिंदे हे लोकसभेच्या निवडणुकीला सामोरे जात आहे. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पवार गट समाविष्ट असल्यानं शरद पवार आणि सुशीलकुमार हे हे दोघे एकत्र येणं क्रमप्राप्त आहे.

तथापि, माढ्याच्या उमेदवारीवरून नाराज झालेला मोहिते-पाटील परिवार 'कमळ' बाजूना ठेवून पुन्हा बारामतीकर शरद पवार गटाच्या वळचणीला जात आहेत. मोहिते-पाटील आणि शरद पवार यांच्यामधील राजकीय संबंधाचा नव्या अध्याय सुरू होत आहे. त्यातून शरद पवार, विजयसिंह मोहिते-पाटील आणि सुशीलकुमार शिंदे हे त्रिदेव सोलापूर आणि माढ्याच्या महासंग्रामात उतरताहेत. साधारण १५ वर्षांपूर्वी २००९ मध्ये राजकारणातील हे तिघे भीष्म एकत्र होते. त्यांच्या नेतृत्वाचा मोठा करिष्मादेखील दिसला होता.




### कशासाठी राजकारणासाठी.. खासदारकीच्या तडजोडीसाठी...



पवार, मोहिते-पाटील आणि शिंदे यांचं १५ वर्षांनंतर एकत्र येण्याचं तसं खास व्हिजन आहे. राष्ट्रवादीच्या फाटाफुटीत मोठे मासे अजित पवारांसोबत गेले. तुलनेत शरद पवारांकडं तशी नेतेमंडळींची टीम कमीच राहिली. स्वत:च्या गटाचं तगडं अस्तित्व राज्यात ठेवण्यासाठी शरद पवार प्रयत्नशील आहेत. याच वेळी मोहिते-पाटील यांच्यासारखा पश्चिम महाराष्ट्रामध्ये मोठी ताकद असलेला गट हाताशी लागणे हे शरद पवारांच्या दृष्टीने फायदेशीर आहे. म्हणून शरद पवार हे मोहिते-पाटील यांना घेण्यासाठी तडजोड करताहेत. तर विजयसिंह मोहिते-पाटील यांना आपल्या गटाची ताकद भाजपला दाखवून धैर्यशील मोहिते-पाटील यांना खासदार करायचं आहे, म्हणून शरद पवारांसोबत ते तडजोड करताहेत. असचं काहीसं सुशीलकुमार शिंदेंच्याबाबतीत आहे. कन्या आमदार प्रणिती शिंदेंच्या खासदारकीसाठी त्यांनी काही तडजोडी केल्या आहेत.